**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Address - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र. ४७३ दि.०७/०३/२०२०**

## युनिट ४,गुन्हे शाखा पुणे शहर

## सराईत गुन्हेगारांकडून विक्रीसाठी आणलेले ०६ गावठी पिस्टल(अग्निशस्त्रे) व १२ काडतुसे युनिट ४,गुन्हे शाखेकडून हस्तगत.

**समर्थ पोलीस स्टेशन गुरनं ६९/२०२० आर्म ॲक्ट क ३(२५) मपोआ का क ३७(१) सह १३५**

मा पोलीस आयुक्त श्री के व्यंकटेशम व मा.पोलीस सह आयुक्त श्री. रविंद्र शिसवे यांनी गुन्हेगारांचे विशेषतः अग्निशस्त्रे व कोयता बाळगणारे गुन्हेगारांचा शोध घेवून त्यांचे हालचालीवर देखरेख ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते.त्यानुसार मा अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री अशोक मोराळे व मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री बच्चनसिंह यांनी गुन्हे शाखा सर्व युनिट यांना त्याबाबत मार्गदर्शन केले होते. गुन्हे शाखा युनिट ४ चे पोलीस हवालदार सुनिल पवार यांना माहिती मिळाली की, गुन्हे कार्यप्रणाली अभिलेखावरील दोन गुन्हेगार समर्थ व्यायाम शाळेजवळ,रास्ता पेठ,पुणे येथे येणार आहेत व त्यांचेकडे गावठी पिस्टल (अग्निशस्त्रे) आहेत. त्या माहितीवरुन पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक श्री विजय झंजाड, पोलीस कर्मचारी सुनिल पवार, सचिन ढवळे, अतुल मेंगे, विशाल शिर्के, दत्ता फुलसुंदर, यांचे पथक तयार करुन सापळा लावला असता, दोन इसम हे गावठी पिस्टल व काडतुसांसह मिळून आले. त्यांना जागीच पकडून नाव पत्ता विचारता त्यांची नावे १. रोहन ऊर्फ दुध्या सुभाष चव्हाण, वय ३३ वर्षे, रा. श्रेयश अपार्टमेंट,२०७,सोमवार पेठ, दारुवाला पुल,पुणे २. चंद्रशेखर रामदास वाघेल, वय ३० वर्षे, रा. मुंकुदनगर,पुणे असे सांगितले. ते रेकॉर्डवरील आरोपी असून, त्यांचेकडे चौकशी केली असता, आणखी ०४ अग्निशस्त्रे व ०९ मिळून आले. त्यांच्याकडून एकुण ०६ गावठी पिस्टल व १२ काडतुसे जप्त करण्यात आलेली आहेत.

आरोपी रोहन ऊर्फ दुध्या सुभाष चव्हाण याचेवर सन २०१६ रोजी सेंधवा,मध्यप्रदेश येथे गावठी पिस्टल खरेदी करायला गेला असता, त्यास तेथील व्यापारी व ०८ पिस्टलसह पकडण्यात आले होते. त्यावेळी तो सेंधवा येथे अटक होता. त्यावेळी सेंधवा येथील अग्निशस्त्र विकत घेणारा अशी त्याची ओळख झाली होती. त्या केसच्या सुनावणीसाठी तो मागिल ०६ महिन्यात दर दोन महिन्यांनी सेंधवा न्यायालयात जात होता. नोव्हेंबर २०१९ च्या पहिल्या आठवडयात त्याचा सहकारी मित्र चंद्रशेखर वाघेल याचेसह तारखेला गेला असता, ०४ पिस्टल आणले होते व जानेवारीमध्ये पुन्हा दोन पिस्टल आणले होते. सदरचे पिस्टल पैकी ०५ पिस्टल आरोपी रोहन याने स्वतःजवळ व एक पिस्टल चंद्रशेखर याने ठेवले होते. रोहन ऊर्फ दुध्या हा यापुर्वी समर्थ पोलीस स्टेशन येथे अग्निशस्त्राच्या गुन्हयात अटक होता. आरोपींच्या चौकशीमध्ये अधिक पिस्टल मिळण्याची शक्यता आहे. यातील आरोपी रोहन ऊर्फ दुध्या चव्हाण याचेविरुध्द पुणे शहरात जबरी चोरी, दरोडयाची तयारी, हत्यार बाळगणे,विक्री करणे असे एकुण २३ गुन्हे व सेंधवा,मध्यप्रदेश येथे एक गुन्हा असे मिळून **२४** गुन्हे दाखल आहेत. चंद्रशेखर वाघेल याचेविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन येथे खूनाचा प्रयत्न केल्याबददल **०१** गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी मा अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंह, सहा पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार, श्री. विजय चौधरी, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक विजय झंजाड, पोलीस कर्मचारी सुनिल पवार, सचिन ढवळे, अतुल मेंगे, निलेश शिवतरे, विशाल शिर्के, राकेश खुणवे, दत्तात्रय फुलसुंदर, गणेश साळुंखे, भालचंद्र बोरकर, सुहास कदम, राजू मचे, अशोक शेलार, शंकर पाटील, शितल शिंदे यांनी केली आहे.